स्थायी समितीच्या **बुधवार दिनांक** 08/07/2015 रोजी सायंकाळी 05.00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 3. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 4. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 5. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 6. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 7. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 8. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 9. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 10. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 11. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 12. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 13. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 14. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 15. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 16. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 113:— 1) आप्तेष्ठांच्या मृत्यु पश्चात प्रेताला अग्नी देणे याचा सरळ संबंध श्रध्दा व भावनेशी असल्यामुळे अनेकांची मोफत स्वरूपात अंत्यसंस्कार करण्याची मानसीकता नसते. म.न.पा. द्वारे अंत्यसंस्कारासाठी करण्यात येणारे लाकडे, गोवऱ्या तसेच एलपीजी व डिझेल दाहिनीवरचे शवदहन पूण्रता निशुल्क करण्याऐवजी त्या करीता खालील प्रमाणे शुल्क आकारण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

अ) मा. नगरसेवक यांनी मृतक आर्थिक दृष्टया दुर्बल असल्याचे प्रमाणित

केल्यास अथवा मृतक बीपीएल अंतर्गत येणाऱ्या परिवाराचा सदस्य असल्यास रूपये 500/— प्रति दहन (बीपीएल यादी सर्व घाटांवर उपलब्ध करून देण्यात येईल.)

ब) मृतक उपरोक्त 'अ' मध्ये मोडत नसल्यास वास्तविक दराने शुल्क (लाकडे व गोवऱ्या खरेदी निविदा दर) आकारण्यात येईल.

क) गोवऱ्या, एलपीजी व डिझेल वर दहन केल्यास प्रति दहन रूपये 200/— (पर्यावरण पुरक दहनाला प्रोत्साहन देण्याकरीता आवश्यक आहे.)

2) मनपाच्या दहन घाटा करीता लागणाऱ्या लाकडांचा दरकरार सपुष्टात आला असून पुढील दोन वर्षासाठी निविदेद्वारे दरकरार करणे आवश्यक आहे. निविदाकारास प्रती शव 300 किलो प्रमाणे लाकडाच्या किमतीचे व 10 किलो प्रमाणे गोवऱ्याच्या किमतीचे भूगतान करण्यात येईल. दहनासाठी अतिरीक्त लाकडे किंवा गोवऱ्याची आवश्यकता भसल्यास लोकांना कंत्राटदाराकडून मंजूर दरावर विकत घेता येतील. नविन निविदा दर निश्चित होईस्तोवर लाकडांची जुन्याच दरावर खरेदी करण्यात येईल. एका वर्षात दहनासाठी अंदाजे 5400 टन लाकडाची आवश्यकता राहील व यावर सध्याच्या बाजार दराप्रमाणे अंदाजे रूपये 3,05,00,000/— (तीन कोटी पाच लक्ष) खर्च अपेक्षीत असून होणारा खर्च पद क्र. A23501141211 मधून भागविण्यात येईल.

उपरोक्त अ.क्र. 1 धोरणात्मक निर्णयास्तव मनपा सभागृहासमोर पाठविण्यात येईल व अ.क्र. 2 नूसार दोन वर्षाकरीता निविदा मागवून लाकुड खरेदी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1)

अ) प्रचलित पध्दतीनुसार निशुल्क व्यवस्था कायम सुरु राहील.

ब) स्वेच्छे नुसार जे नागरीक भुगतान करु इच्छीतात त्यांचे कडुन शुल्क घेण्यास हरकत राहणार नाही. हे शुल्क म.न.पा. कडे जमा करणे व त्याचे देयक पावती देण्याची जबाबदारी प्रशासनास बंधन कारक राहील. तसेच या बाबतचे शहरातील संपूर्ण दहन घाटावर फलक लावणे अनिवार्य असेल.

2)

अ) म.न.पा.च्या घाटावर गोवऱ्या खरेदी ही महीला बचत गटाकडुन खरेदी करण्यात यावी.

ब) अंबाझरी दहन घाटावर जुन्या गोवऱ्या पुरवठादार (N.G.O.) यांस नियमाप्रमाणे कायम ठेवावे.

वरील सुचनेसह दोन महीण्याच्या आंत निविदा प्रक्रीया पूर्ण करुन स्थायी समितीची मान्यता घेणे बंधन कारक राहील. या प्रकरणात कुठलेही मुदतवाढ भविष्यात स्थायी समिती देणार नाही याची नोंद प्रशासनानी घ्यावी. यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

अ.नु.क्र. 1 धोरणात्मक निर्णयास्तव म.न.पा. सभागृहाच्या मंजूरीस पाठविण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 114:— महानगरपालिकच्या मालमत्तेवर एकुण ११ जाहिरात फलक उभारुन त्यावर जाहिरात करण्याचे अधिकार देण्यासंबंधात प्राप्त झालेल्या रु. १६,१०,७००/— च्या निविदा खाली तक्त्यामधे नमुद केल्याप्रमाणे मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ क्र | निविदाकाराचे नांव | एकुण जाहिरात फलक | साईट क्र. | एकुण निविदा (ऑफसेट) किंमत | एकुण प्राप्त महत्तम निविदा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. गीत पब्लिसिटी | ३ | ८७, १३३, २०७ | रु. ३,८४,९३०/— | रु. ३,९२,४००/— |
| २ | मे. शार्प ॲडव्हरटायजींग एजेन्सी | ३ | ६०, १२२, २२१ | रु. ४,८७,३८४/— | रु. ५,२३,०००/— |
| ३ | मे. एविस ॲडव्हरटायजींग एजेन्सी | ५ | ७६, १५२, १६७, २०६, २२० | रु. ६,८२,१४५/— | रु. ६,९५,३००/— |
| एकुण | | ५३ | | रु. १५,५४,४५९/— | रु. १६,१०,७००/— |

ठराव क्रमांक 115:— महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात नागरी पायाभूत व सामाजिक सुविधा निर्माण करणे व त्यांच्या बळकटीकरणासाठी जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर)" अंतर्गत एकूण रू. 3,30,18,165/— रकमेचा 22 कामांचा प्रस्ताव शासनास सादर करावयाचा असून, एकूण रकमेच्या 50 टक्के रू. 1,65,09,083/— म.न.पा.चा सहभागास मंजूरी प्रदान करण्याचा तसेच याकरीता म.न.पा. अंदाजपत्रकात नविन व्यय पदाचे निर्माण करून, त्यात रू. 1,65,09,083/— रकमेची तरतूद करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रभाग क्र. 67 मधील, रस्ते व गडर लाईन च्या कामाचा समावेश करण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 116:— नागपूर शहर भविष्यकालीन पाणीपुरवठयाकरीता, जलसंपदा विभागाने कन्हान नदीवरील प्रस्तावित कन्हान जलविद्युत प्रकल्पातून विसर्जीत होणाऱ्या पाण्यापैकी 9 अब्ज घन मिटर (9TM/255 दलघमी प्रती वर्ष /700 दलली प्रतीदिन) प्रती वर्ष प्रमाणे, जोवनी खापा येथे प्रस्तावित उन्नीय बांधारा ( pickup wear) येथुन देण्याचे प्रस्तावीत आहे. हे पाणी जोवनीखापा उन्नीय बांधाऱ्यातुन पाईपलाईनद्वारे अमरावती रोड वरील वेणा जलाशयामार्फत नागपूर शहरास प्राप्त होणार आहे व त्याकरीता वेणा जलाशयाची पाणी साठवणूक क्षमतेत वाढ करणे गरजेचे आहे.

सदर्हू पाणी पाईपलाईनने आणणे व वेणा जलाशयाच्या बांधाऱ्याची उंची वाढऊन साठवणुक क्षमता वाढविणे ईत्यादीचा प्राथमीक अभ्यास (सर्वेक्षण) करण्याकरीता खालीलप्रमाणे संभावीत खर्चाचे भुगतान पाटबंधारे व जलविद्युत प्रकल्प अन्वेषण विभाग नागपूर यास करणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | वेणा तलावाच्या बुडीत क्षेत्राचे सर्वेक्षण – | रू. 9.00 लक्ष |
| 2. | चाचणी खड्डे व विंधन छिद्र – | रू. 20.00 लक्ष |
| 3. | मृद चाचणी अहवाल प्राप्त करणे – | रू. 20.00 लक्ष |
| 4. | अ) मध्येप्रदेश सिमा ते वेणा तलावापर्यंत पाणी वाहून आणण्याकरीता सर्वेक्षण व अन्वेषणाचा खर्च – | रू. 18.00 लक्ष |
| | ब) चाचणी खड्डे व विंधन छिद्र – | रू. 7.00 लक्ष |
| | एकुण | रू. 74.00 लक्ष |

कार्यकारी अभियंता, पाटबंधारे व जलविद्युत प्रकल्प अन्वेषण विभाग, नागपूर' यास वरीलप्रमाणे रू. 74.00 लक्षचे भुगतान करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन संभावित खर्चाचे भुगतान म.न.पा. द्वारे 50% व मेट्रोरिजन प्राधिकरण द्वारे 50% या तत्वावर करण्यास एकमताने मंजूरी प्रदान करण्यात येते. तसेच भविष्यात याच तत्वावर येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी प्रशासनाने करावी या सुचनेस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 117</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर